# नागपूर सुधार प्रन्यास

## हॉटमिक्स प्लांट विभाग

नागपूर सुधार प्रन्यास च्या स्वमालकीच्या हॉट मिक्स प्लांट व्दारे या आर्थिक वर्षात १३ करोड चे डांबरीकरणाचे काम (नागपूर शहरातील विविध योजनेअंतर्गत) पूर्ण करण्यात आलेले आहे. यामध्ये मुख्यत्वे १९०० लेआउट, ५७२ लेआउट JNNURM, DVSY, MP Fund, MLA Fund, NIT Fund, Special Govt. Grant, NMC Deposit work या निर्देशित शिर्षकाखाली कामे करण्यात आली आहेत. यामध्ये मुख्यत्वे मौजा वाठोडा, बाबुलखेडा, सोनेगांव, चिखली, सोमलवाडा, गोरेवाडा, इंदोरा, बिनाखी, बिडपेठ, झिंगाबाई टाकळी, दाभा, दिघोरी, पारडी, नारी तसेच नागपूर शहरातील दलित वस्त्या मधील विविध अभिन्यासात डांबरीकरणाची कामे करण्यात आलेली आहेत. व NMC Deposit work अंतर्गत एअर पोर्ट रोड, इतवारा स्टेशन रोड चे काम पूर्ण झालेले असून सेन्ट्रल अव्हेन्यु रोडचे काम हे मेयो हॉस्पीटल चौक ते टेलिफोन एक्सचेंज चौक पर्यंत झाले असून उर्वरीत काम प्रगतीपथावर आहे.

तसेच उर्वरीत मंजूर झालेली रु. ९ करोड ची कामे या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात येतील. या व्यतिरीक्त Flood Relief fund व खासदार/आमदार निधी या अंतर्गत शासनाव्दारे नागपूर सुधार प्रन्यासला वितरीत करण्यात येणाऱ्या निधीतून १५ करोडची कामे असे एकूण २४ करोड ची डांबरीकरणाची कामे युध्दपातळीवर सुरु करण्यात येईल.